
# कोल्हापुरी बोली

## तत्त्व आणि व्यवहार

प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर



# कोल्हापुरी बोली :
# तत्त्व आणि व्यवहार

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

तेजश्री
प्रकाशन

कोल्हापुरी बोली : तत्त्व आणि व्यवहार

प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर
कोल्हापूर
मोबा. ९३२५७२६५९३,
९४२३२८३७०३

**सर्वाधिकार :**
लेखकाधिन

**प्रथमावृत्ती :**
३० मार्च, २०२५ (गुढीपाडवा)

**ISBN :**
978-93-94617-98-8

**प्रकाशक :**
**दादासाहेब काका जगदाळे**
**तेजश्री प्रकाशन**
महालिंग मळा, यशवंत कॉलनीजवळ
मु. पो. कबनूर, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६ १३८.
मोबा. ८२७५६३८३९६

**मुखपृष्ठ :**
अविनाश कुंभार, कोल्हापूर

**मुद्रक :**
**भारती मुद्रणालय, कोल्हापूर.**
८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर
फोन नं. ०२३१- २६५४३२९

**मूल्य :**
रु. १८०/-

# अनुक्रमणिका

१. बोली : सैद्धांतिक विचार ........................................ ११

२. कोल्हापुरी बोली : भाषाशास्त्रीय विचार ........................ १७

३. कोल्हापुरी बोली : वैशिष्ट्यपूर्ण शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार .... २५

४. कोल्हापुरी बोलीतील शब्द, त्याचा अर्थ व वाक्य .................. ५८

५. समारोप ........................................................ ८९

प्रकरण पहिले

# बोली : सैद्धांतिक विचार

'बोली' हा शब्द ग्रीक भाषेमध्ये सर्वप्रथम वापरला गेला. ग्रीक भाषेमधून हा शब्द युरोपियन भाषांमध्ये रूढ झाला. 'बारा कोसाला भाषा बदलते', या उक्तीनुसार बारा कोसाला भाषा बदलत असेल, असा अर्थ घेतला जातो. पण बारा कोसाला भाषा बदलत नसून त्यातील वैशिष्ट्ये बदलतात. ही वेगवेगळी वैशिष्ट्ये विविध बोलींशी संबंधित असतात. 'बोलली जाणे' ही कोणत्याही भाषेची पहिली आणि प्रधान अट असते. 'बोली' म्हणजे एखाद्या व्यापक भाषिक परिसरातील प्रादेशिक भाषा या अर्थाने 'बोली' ही संज्ञा वापरली जाते.

**'बोली' व्याख्या**

बोलीची व्याख्या अनेक भाषा अभ्यासकांनी केली आहे. त्यातून बोलीचे वेगळेपण जाणवते. सु. बा. कुलकर्णी यांनी पुढीलप्रमाणे बोलीची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, ''सामान्यत: ज्या भाषाभेदांना लेखनपरंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषाभेदांना बोली (Dialect) अशी संज्ञा आहे.'' (पृष्ठ : ७१, 'भाषा व साहित्य : संशोधन'– संपादक डॉ. वसंत जोशी)

''ज्या व्यक्तीसमूहाला आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक स्वरूप वापरतो असे वाटते त्याची भाषा म्हणजे बोली. ही एकरूपता तात्त्विक स्वरूपाची असते आणि भाषेच्या सामाजिक प्रश्नात असणे यापेक्षा वाटणे याला बहुतेकवेळा अधिक महत्त्व असते.'' (कालेलकर ना. गो., मराठी